# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र-१२५/२०२५** **दिनांक- १७/०३/२०२५**

## प्रेस नोट

### मिसींग इसमाचा एक महिन्यापुर्वी केलेल्या खुनाचा गुन्हा उघड करण्यास नायगाव पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण शाखेस यश

नायगाव पोलीस ठाणे हद्दीत सनटेक बिल्डींग, टिवरी रोड, नायगाव पुर्व ता. वसई, जि.पालघर येथे इसम नामे किशोर ब्रिजमोहन मिश्रा वय ७५ वर्ष, हा फेरीचा व्यवसाय करत होता. इसम किशोर मिश्रा हा बोरीवली येथे राहण्यास होता. दिनांक १५/०२/२०२५ रोजी मिसींग इसम हा नायगांव येथुन राहत्या घरी परत आला नाही. म्हणुन त्याचे नातेवाईक यांच्याकडे त्याचा शोध घेतला असता, तो मिळुन आला नाही. म्हणुन त्याचा मुलगा नामे श्यामलाल किशोर मिश्रा याने दिलेल्या खबरीवरुन नायगाव पोलीस ठाणे येथे मनुष्य मिसींग नं २१/२०२५ दाखल करण्यात आली होती. सदर मनुष्य मिसींग पुढील तपासकामी पोहवा/ देविदास पाटील यांच्याकडे देण्यात आली होती.

सदर मिसींग इसम किशोर मिश्रा यांचा मोबाईल फोन बंद लागत असल्याने मिसींग इसमाबाबत काही एक उपयुक्त माहिती मिळत नसल्याने सदर प्रकरणाची गंभीर्याने दखल घेवुन मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक नायगाव पोलीस ठाणे यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे दोन वेगवेगळे पथके बनवुन मिसींग इसमाचा शोध घेणेबाबत सुचना दिल्या. मिसींग प्रकरणाचे तपासदरम्यान मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेज आधारे मिसींग इसम हा एक मुलीसोबत भाईदर रेल्वे स्टेशन परिसरात उतरुन बाहेर पडताना दिसला. त्यानंतर मिसींग इसम व संशयीत मुलगी दिसुन न आल्याने तांत्रिक विश्लेषन व गोपनीय माहितीच्या आधारे एक विधीसंघर्षग्रस्त मुलगी व एक विधीसंघर्षग्रस्त मुलगा यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण चौकशी केली असता, सदर मिसींग इसम किशोर मिश्रा हा विधीसंघर्षग्रस्त मुलीस कामाचे ठिकाणी कायम शिवीगाळी करत असल्याने त्या गोष्टीचा राग मनात धरुन उत्तन पोलीस ठाणे हद्दीतील बालेशाह पीर दर्गाच्या बाजुला असलेल्या सार्वजनिक शौचालयाच्या जवळ विधीसंघर्षग्रस्त मुलगी व तिचा विधीसंघर्षग्रस्त मित्र यांनी डोक्यात दगड व परशीची लादी टाकुन मिसींग इसम किशोर मिश्रा याचा खुन करुन त्याची बॉडी बाजुला असणा-या झाडा-झुडपात फेकुन दिली. म्हणुन त्यांच्याविरुध्द उत्तन सागरी पोलीस ठाणे गुन्हा रजि नं I २७/२०२५ बी.एन.एस.कायदा कलम १०३(१),२३८,३(५), अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर एक विधीसंघर्षग्रस्त मुलगी व एक विधीसंघर्षग्रस्त मुलगा यांना पुढील कायदेशीर कारवाई करिता उत्तन सागरी पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले आहे.

वरील कामगीरी मा. श्री. मधुकर पांण्डेय, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अप्पर पोलीस आयुक्त, मा. श्रीमती पौणिमा चौगुले पोलीस उप आयुक्त, परीमंडळ - २ वसई, मा. श्री. नवनाथ घोगरे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई विभाग, नायगाव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विजय कदम, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. प्रमोद पवार यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/रोशन देवरे, सपोनि/गणेश केकान, पोहवा/देविदास पाटील, पोहवा/शेखर पवार, पो.अंम. सचिन ओलेकर, सचिन मोहीते, सचिन खंताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, चेतन ठाकरे, अशोक पाटील, पाडुरंग महाले, पोशि/अमोल बरडे नेमणुक- पो.उप आयुक्त सो परिमंडळ नं ०२,वसई यांनी यशस्वीरित्या कामगीरी पार पाडली आहे.

------ooooo------